DAY — 17 SEAT NUMBER

| 2022 | III | 24 | 1500 | J-859 | (M) |
|---|---|---|---|---|---|

# PSYCHOLOGY (48)

Time : 3 Hrs. (4 Pages) Max. Marks : 80

*सूचना : (१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.*
*(२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.*
*(३) प्रत्येक प्रश्नाच्या उत्तराचा प्रारंभ नवीन पृष्ठावर करावा.*

प्र. १. (अ) कंसातील योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करून पुन्हा लिहा : (५)[२०]

(१) ------ पद्धतीमुळे मानसशास्त्राला शास्त्र म्हणून दर्जा मिळाला आहे.
(अ) प्रायोगिक (ब) सर्वेक्षण
(क) वृत्तेतिहास

(२) ------ ही वैयक्तिक बुद्धिमापन चाचणी आहे.
(अ) आर्मी अल्फा टेस्ट (ब) आर्मी बीटा टेस्ट
(क) ब्लॉक बिल्डिंग टेस्ट

(३) कथावस्तू आसंवेदन चाचणी --------- या मानसशास्त्रज्ञाने विकसित केली.
(अ) रोर्शा (ब) गिलफोर्ड
(क) मॉर्गन आणि मरे

(४) अभिजात अभिसंधानाचा जनक म्हणून------ यांना ओळखतात.
(अ) बीने (ब) इव्हॉन पॅव्हलॉव्ह
(क) स्किनर

(५) जेव्हा तुम्ही दुसऱ्या व्यक्तीस तुमचे शोषण करण्यास परवानगी देता, तेव्हा तुम्ही ------ बळी असता.

(अ) शारीरिक (ब) भावनिक

(क) सामाजिक

**(ब)** खालील 'अ' व 'ब' गटांतील शब्दांच्या योग्य जोड्या लावा : (५)

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) कार्यवादाचा उगम | (१) भावनांचा आराखडा |
| (ब) वर्तन विश्लेषण | (२) विल्यम जेम्स |
| (क) प्लुटचिक | (३) मुलाखत |
| (ड) मानसिक आरोग्यासाठी प्रथमोपचार | (४) अडथळ्यांवर मात |
| | (५) विल्हेम वुंट |
| (इ) लवचिकता | (६) अल्गी (ALGEE) कृती योजना |

**(क)** खालील विधाने 'बरोबर' आहेत की 'चूक' ते लिहा : (५)

(१) मानसशास्त्र म्हणजे मानसिक प्रक्रियांचा अभ्यास करण्याचे शास्त्र होय.

(२) जाणीवेच्या क्षेत्रातील वस्तू, व्यक्ती व घटना जाणीवेच्या केंद्रस्थानी आणण्याची मानसिक प्रक्रिया म्हणजे अवधान होय.

(३) स्वत:च्या हिताचा विचार करणे अपराधीपणाचे वाटले पाहिजे.

(४) मानसिक आरोग्य व्यावसायिकांकडून मदत मिळविण्यातील प्रमुख अडचण म्हणजे आजारासंबंधीचे कलंक होय.

(५) दुसऱ्या व्यक्तीचा अनुभव तिच्या संदर्भातून समजून घेणे म्हणजे सहानुभूती होय.

**(ड)** खालील प्रश्नांची प्रत्येकी '<u>एका</u>' वाक्यात उत्तरे लिहा : (५)

(१) प्रयोगकर्ता कोणास म्हणतात?

(२) कंठस्थ ग्रंथीमधून कोणता स्राव पाझरतो?

(३) साधक अभिसंधानाद्वारे अध्ययन यांसाठी कोणाला ओळखले जाते?

(४) ॲक्झायटी हा शब्द कोणत्या लॅटिन शब्दापासून तयार झाला आहे?

(५) सकारात्मक मानसशास्त्राची संकल्पना कोणी मांडली?

**प्र. २. खालील प्रश्नांची प्रत्येकी २५ ते ३० शब्दांत उत्तरे लिहा ( कोणतीही पाच ) :** **[१०]**

(१) बेफिकिरीपणाच्या अवस्थेचे तुमच्या शब्दांत वर्णन करा.

(२) सामूहिक बुद्धिमापन चाचण्यांच्या मर्यादा स्पष्ट करा.

(३) व्यक्तिमत्वावर प्रसार माध्यमांचा प्रभाव कसा पडतो ते, तुमच्या शब्दांत लिहा.

(४) संवेदनातील समीपतेचे तत्त्व स्पष्ट करा.

(५) चेहेऱ्यावरील प्रतिसाद गृहीतक स्पष्ट करा.

(६) 'व्यावसायिक तज्ज्ञांची मदत घेण्यास प्रवृत्त करण्याचे महत्त्व' म्हणजे काय? तुमच्या शब्दांत लिहा.

(७) तद्नुभूती वाढविण्याचे कोणतेही दोन उपाय तुमच्या शब्दांत लिहा.

**प्र. ३. खालील बाबींवर प्रत्येकी ५० ते ६० शब्दांत टिपा लिहा ( कोणत्याही चार ) :** **[१२]**

(१) सहसंबंधाचे प्रकार

(२) द्विधृवीय विकृती

(३) इंटरनेटचे परावलंबित्व

(४) प्रायोगिक पद्धती

(५) आघात पश्च्यात तणाव विकृती

(६) चिंतेची कारणे

**प्र. ४. खालील उदाहरणांवर आधारित प्रश्नांची केवळ शब्दांत उत्तरे लिहा (कोणतेही चार) :** **[८]**

(१) कोविड केअर सेंटरमध्ये रुग्णांना औषधे देण्यासाठी स्वयंचलित रोबोचा वापर करण्यात आला, या स्वयंचलित रोबोचे कार्य बुद्धिमत्तेच्या कोणत्या प्रकारावर आधारित आहे?

(२) वाढदिवसाच्या पार्टीला विवेक गेला असता, त्याचे मित्रमैत्रिणी मद्यपान करत होते. त्यांनी विवेकला आग्रह करूनही विवेकने मद्यपान करण्यास ठामपणे नकार दिला. विवेकच्या या वर्तनातून व्यक्तिमत्वाच्या पंचघटक प्रारूपातील कोणता गुण दिसून येतो?

(३) फटाक्याच्या आवाजामुळे शीतलची अभ्यासातील एकाग्रता खंडीत झाली आणि ती पुन्हा अभ्यासावर लक्ष केंद्रित करू शकली नाही, तर अवधानाच्या कोणत्या अंगाचे हे वर्णन आहे?

(४) भावनिक सुदृढता राखण्यासाठी सुनिता नियमित भरतकाम करते, तर भावनिक सुदृढता राख्यासाठी सुनिता कोणत्या पातळीवरील उपाय अवलंबते?

(५) अरुणाला ऑनलाईन वस्तू विकत घेण्याचे (शॉपिंगचे) व्यसन लागले आहे. कितीही वस्तू खरेदी केल्यातरी तिचे समाधान होत नाही. अरुणाला कोणत्या प्रकारचे व्यसन जडले आहे?

(६) आपल्या मुलीचे कर्करोगाने निधन झाल्यानंतर वसंताने कर्करोगाचे पुनर्वसन केंद्र सुरू केले, वसंताच्या वर्तनातील सकारात्मक गोष्ट कोणती?

**प्र. ५. खालील संकल्पना २५ ते ३० शब्दांत स्पष्ट करा (कोणत्याही पाच) :** **[१०]**

(१) सर्वेक्षण पद्धती

(२) भाषिक बुद्धिमापन चाचणी

(३) अवधान कक्षा

(४) भावना

(५) भयगंड

(६) मानसिक लवचिकता

(७) सहनशीलता – तर्कसंगत व्यक्तीचे एक वैशिष्ट्य

**प्र. ६. खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे प्रत्येकी ८० ते १०० शब्दांत लिहा :** **[१०]**

(१) सर्जनशील विचारातील विविध अवस्था स्पष्ट करा :

(i) पूर्वतयारी (ii) उबवण

(iii) प्रदीपण (iv) पडताळणी

(२) राग व्यवस्थापनातील प्रतिसाद दृष्टिकोन स्पष्ट करा :

(i) कुटुंबातील व्यक्तींशी बोलणे

(ii) समोरच्या व्यक्तींशी बोला

(iii) सक्रिय श्रवण

(iv) बोलण्यात ठामपणा

(३) छिन्नमनस्कतेची धनात्मक लक्षणे स्पष्ट करा :

(i) विभ्रम (ii) भ्रांती

(iii) असंघटीत संभाषण (iv) विसंगत भावना

**प्र. ७. पुढीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर सुमारे १५० ते २०० शब्दांत स्पष्ट करा :** **[१०]**

(१) बुद्धिमापन चाचण्यांची विविध क्षेत्रातील उपयुक्तता स्पष्ट करा.

(२) व्यक्तिमत्व म्हणजे काय? व्यक्तिमत्व मापनातील प्रक्षेपण तंत्रावर आधारित विविध चाचण्यांची माहिती लिहा.

◆◆◆